मुळा एज्युकेशन सोसायटी चे

# कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सोनई

## लैंगिक छळ प्रतिबंध समिती

आयोजित व्याख्यान कार्यक्रम

## "लैंगिक छळ व तरतूदी"

दि.19 ते 21 जुलै 2018 रोजी महाविद्यालयांतील सेमिनार हॉल येथे सकाळी 10.40 ते 11.45 या काळात विविध शाखाच्या प्रथम वर्ष वर्गातील विद्यार्थीनी साठी लैंगिक छळ व तरतूदी या विषयांवर व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमांत व्याख्याता म्हणून प्रा. डॉ. श्वेता चौधारे यांनी मार्गदर्शन केले.

महाविद्यालयांत विविध विभागात कार्यरत महिला कर्मचारी व विद्यार्थीनी चे लैंगिक छळा पासुन संरक्षण व सहायते साठी महाविद्यालयात लैंगिक छळ प्रतिबंध समिती ची स्थापना करण्यात आली आहे. शैक्षणिक वर्ष 2018–19 साठी चे वार्षिक नियोजना प्रमाणे सदर शैक्षणिक वर्षाच्या प्रथम सत्रांत नवीन प्रवेशित विविध शाखांच्या विद्यार्थीनी साठी लैंगिक छळ म्हणजे काय ? कोणत्या प्रसंगानां लैंगिक छळ अंतर्गत घेण्यात आले आहे ? लैंगिक छळ विरोधात कायद्यांत काय तरतुदी आहे ? लैंगिक छळ विरुद्ध महाविद्यालयीन पातळीवर स्थापन लैंगिक छळ प्रतिबंध समिती कार्य कसे करते ? या बाबत लैंगिक छळ प्रतिबंध समिती च्या महाविद्यालयीन समन्वयक प्रा. डॉ. श्वेता चौधारे यानी संगणक प्रस्तुतीकरणाच्या माध्यमांतुन माहीती दिली. लैंगिक छळ विरोधी कायदेशीर मार्गाने लढाई करणाऱ्या विशाखा समिती च्या मार्गदर्शक तत्व व या मागील इतिहास या बाबत विद्यार्थीनीनां माहीत देण्यात आली. लैंगिक छळांबाबत ची अनभिज्ञता सामाजिक स्वास्थ्य तसेच विद्यार्थी दशेस कशी हानीकारक ठरते, या बाबत डॉ. चौधारे यांनी विविध उदाहरणे दिली. व्याख्यानात डॉ. चौधारे यानी लैंगिक छळ प्रतिबंध समिती मधील सदस्यांची माहीती दिली, तसेच समिती कडे तक्रार करण्याची पद्धत व त्यांची कार्यप्रणाली या बाबत माहीती दिली.

तीन दिवस चाललेल्या या कार्यक्रमाचा प्रथम वर्ष वर्गात शिकणाऱ्या 217 विद्यार्थीनी नी लाभ घेतला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रीमती कुसळकर व श्रीमती कोमल कुलकर्णी यांचे सहकार्य लाभले.

**परिणाम –**

लैंगिक छळ विरोधी कायद्यांची माहिती होउन यास गुन्ह्यांचे स्वरूप कसे मिळते, हे समजण्यास विद्यार्थीनीना मदत झाली.

शारीरिक–मानसिक आघात व मानसिक खच्चीकरण यांचे अर्थ समजून अत्याचाराविरुद्ध आवाज उठवण्याचे बळ व प्रोत्साहन विद्यार्थीनीना लाभले.

या व्याख्यानांची परिणामकारकता विद्यार्थीनी कडून प्राप्त लिखित प्रतिक्रियेतून सिद्ध झाली.

# काही क्षणचित्रे

Day 1











Day 2








Committee Against
Sexual Harassment

Day 3


Arts, Commerce And Science College,
Committee Against
Sexual Harassment
organize
Introductory Program On Sexual
Harassment And Provision






Committee Against
Sexual Harassment